**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 09 वाजून 20 मिनिटं**

**दिनांकः 20.05.2022** **वारःशुक्रवार**

---

ठळक बातम्या,

१. पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या 24 तारखेला टोक्योमध्ये होणाऱ्या क्वाड नेत्यांच्या शिखर परिषदेत सहभागी होणार,

२. राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी घेतली सेंट व्हिन्सेंट आणि ग्रेनेडाइन्सचे गव्हर्नर जनरल डेम सुसान दोगान यांची भेट,

३. एटीएममध्ये कार्डाशिवाय पैसे काढण्याची सुविधा प्रदान करण्याचे रिझर्व्ह बँकेचे सर्व बँकांना निर्देश,

आणि

४. देशाच्या अनेक भागात जोरदार पावसामुळे जनजीवन विस्कळित.

मोदी क्वाड

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या 24 तारखेला टोक्योमध्ये होणाऱ्या क्वाड नेत्यांच्या शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. जपानचे पंतप्रधान फुमिओ किशिदा यांच्या आमंत्रणावरून पंतप्रधान या परिषदेस उपस्थित राहणार आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान स्कॉट मॉरिसन हे ही या परिषदेत सहभागी होणार आहेत. ही क्वाड नेत्यांची चौथी बैठक असून पहिली बैठक गेल्या वर्षीच्या मार्च महिन्यात आभासी पद्धतीनं झाली होती. हिंद प्रशांत क्षेत्रातल्या घडामोडींविषयी तसंच परस्पर हिताच्या जागतिक प्रश्नांविषयी चर्चा करण्याची संधी या परिषदेमुळे मिळणार असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते अरिंदम बागची यांनी म्हटलं आहे. क्वाड संघटनेच्या पुढाकारानं सुरु झालेल्या योजनांचा आढावा या बैठकीत घेण्यात येणार असून तसंच परस्पर सहकार्याची नवी क्षेत्र शोधून आगामी काळासाठी उपयुक्त ठरणारी त्याची दिशा आणि धोरण ठरवण्यात येणार आहे.

पंतप्रधान

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज जयपूर इथं होणाऱ्या भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचं दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उद्घाटन करणार आहेत. यावेळी ते पक्षाच्या प्रतिनिधींना संबोधित करणार आहेत. या बैठकीसाठी पक्षाचे अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्यासह राष्ट्रीय उपाध्यक्ष, राष्ट्रीय सरचिटणीस, राष्ट्रीय सचिव, राष्ट्रीय कोषाध्यक्ष, सर्व मोर्चांचे अध्यक्ष, सर्व राज्यांचे

प्रदेशाध्यक्ष, प्रदेश संघटन सचिव आणि अनेक माजी मुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर शनिवारी सर्व राज्यांच्या राज्य संघटना सचिवांची बैठक होणार आहे.

राष्ट्रपती

राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी काल कॅरेबियन राष्ट्रांच्या दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी सेंट व्हिन्सेंट आणि ग्रेनेडाइन्सचे गव्हर्नर जनरल डेम सुसान दोगान यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांनी माहिती तंत्रज्ञान, आरोग्य, शिक्षण, पर्यटन आदी क्षेत्रात सहकार्य वाढवण्याबाबत चर्चा केली. यावेळी 'माहितीची देवाणघेवाण आणि कर संकलनात सहाय्य' आणि 'जुन्या काल्डर समुदाय प्रकल्पाचे नूतनीकरण' याबाबतच्या सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. राष्ट्रपतींनी सेंट व्हिन्सेंट आणि ग्रेनेडाइन्सच्या संसदेला संबोधित केलं. आजच्या गुंतागुंतीच्या समस्यांना तोंड देण्यासाठी, आपण जी नवीन जागतिक व्यवस्था निर्माण करू इच्छितो, ती सर्वसमावेशक आणि जिथं प्रत्येक देश आपले न्याय्य हितसंबंध व्यक्त करू शकेल अशी जागतिक व्यवस्था असावी, असं प्रतिपादन यावेळी राष्ट्रपतींनी केलं.
दरम्यान, काल राष्ट्रपतींनी कालडेर रोडला भेट देऊन भारतीय समुदायाला संबोधित केलं. व्हिन्सेंट आणि ग्रेनेडाइन्समध्ये राहणाऱ्या भारतीय वंशाच्या लोकांमध्ये भारताच्या समृद्ध संस्कृतीचं आणि परंपरेचं दर्शन होतं; असं राष्ट्रपती यावेळी म्हणाले.

जी-सात गट

जी - सात गटातील देशांनी युक्रेनला आर्थिक मदत देण्याचं मान्य केलं आहे. जी-सात गटातील देशांच्या वित्तमंत्र्यांच्या नुकत्याच जर्मनीत झालेल्या शिखर परिषदेत हा निर्णय घेण्यात आल्याचं अमेरिकेच्या वित्त सचिव जेनेट येलेन यांनी पत्रकारांना सांगितलं. युक्रेनला लष्करी, आर्थिक आणि मानवतावादी सहाय्यासाठी 40 अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या मदतीला असेरिकन मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. जर्मनीचे अर्थमंत्री ख्रिश्चन लिंडनर यांनी युक्रेनला 1 पूर्णांक 1 अब्ज अमेरिकन डॉलरची मदत जाहीर केली आहे. युरोपियन देशांनी कर्जाच्या स्वरूपात 9.5 अब्ज अमेरिकन डॉलरचे आर्थिक सहाय्य देण्याचे मान्य केलं आहे. सरकारी कर्मचार्यांचा पगार , निवृत्तीवेतन आणि इतर खर्च भागवण्यासाठी देशाला दरमहा 5 अब्ज अमेरिकन डॉलर्सची आवश्यकता असल्याचं युक्रेनच्या अधिकार्यांनी आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं म्हटलं आहे.

रिझर्व्ह बँक

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं सर्व बँकांना एटीएममध्ये कार्डाशिवाय पैसे काढण्याची सुविधा प्रदान करण्याचे निर्देश दिले आहेत. फसवणूकीला आळा घालण्यासाठी गेल्या महिन्यात रिझर्व्ह बँकेने सर्व बँकांना एटीएममधून कार्ड-शिवाय पैसे काढण्याची परवानगी देण्याचा निर्णय घेतला. मात्र सध्या काही बँकांद्वारेच ही सुविधा दिली जात आहे. या पार्श्वभूमीवर काल एका परीपत्रकाद्वारे बँकेने

हा आदेश दिला आहे. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाला सर्व बँका आणि एटीएम नेटवर्कसह युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस जोडण्याचा सल्ला देण्यात आल्याचंही बँकेनं म्हटलं आहे.

मुजीबुर्रहमान

भारत आणि बांगलादेशने एकत्रितपणे तयार केलेल्या बंगबंधु शेख मुजीबुर्रहमान यांच्यावरील चित्रपटाचा ट्रेलर काल प्रदर्शित करण्यात आला. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकुर आणि बांगलादेशचे माहिती प्रसारण मंत्री डॉ. हसन महमूद यांनी संयुक्तपणे हा 90 सेकंदांचा ट्रेलर प्रदर्शित केला. श्याम बेनेगल यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटाचं नाव “मुजीब- द मेकिंग ऑफ द नेशन” असं आहे.

इंडोनेशिया

इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष जोको विडोडो यांनी येत्या सोमवारपासून पाम तेलाच्या निर्यातीवरील बंदी उठवण्याची घोषणा केली आहे. गेल्या महिन्याच्या 28 तारखेपासून कच्च्या पाम तेलाची (CPO) आणि काही उत्पादनांची निर्य़ात थांबवली होती. त्यामुळे तेलाच्या किमती प्रचंड वाढल्या होत्या. तसंच निर्यात बंदीनंतर देशांतर्गत खाद्यतेलाच्या किमती घसरल्यानं इंडोनेशियातील पाम तेल शेतकऱ्यांनी राजधानीत आंदोलन केलं. या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतल्याचं विडोडो यांनी म्हटलं आहे. इंडोनेशियाच्या या निर्णयामुळे भारतालाही दिलासा मिळाला आहे.

कान्स

फ्रान्समध्ये कान्स चित्रपट महोत्सवात सहभागी होण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राचं शिष्टमंडळ काल रवाना झालं. या शिष्टमंडळात सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिकाऱ्यांसह ‘कारखानीसांची वारी ‘, ‘ पेटारा ‘ आणि ‘ तिचं शहर होणं ‘ या मराठी चित्रपटांचे निर्माते, दिग्दर्शक अर्चना बोरहाडे, मंगेश जोशी, शंकर धोत्रे, समीर थोरात, सिध्दार्थ मिश्रा, रसिका आगाशे याही सहभागी झाल्या आहेत.

झरीन

भारताच्या निखत झरीननं महिलांच्या जागतिक मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक पटकावलं आहे. 52 किलो वजनी गटात तिनं थायलंडच्या जितपोंग जितामास हिला ५-० असं पराभूत केलं. हे भारताचं १० वं सुवर्ण पदक आहे. यापूर्वी मेरी कोम हिनं ६ तर लेखा केसी, जेनी आर एल आणि सरिता देवीनं प्रत्येकी एका सुवर्ण पदकाची कमाई केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या यशाबद्दल झरीन हिच अभिनंदन केलं आहे.

आसाम पूर

पूरग्रस्त आसाममध्ये अद्यापही परिस्थिती जैसे थे आहे. 80 हजारांहून अधिक लोक पुरामुळे बेघर झाले असून या लोकांनी सरकारतर्फे उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या निवार्यांमध्ये आश्रय घेतला आहे. पुराच्या पाण्याची पातळी सतत वाढत असल्यानं रस्ते – पूल वाहून गेले असून त्यामुळे दळणवळण पूर्णपणे विस्कळीत झालं आहे. निर्वासित बेघर लोकांना हवाईमार्गानं अन्नाची पाकिट आणि पाणी पुरवण्यात येत आहे.

काल दिवसभरात सात हजारांहून अधिक लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आलं. आरोग्य मंत्रालयानं वैद्यकीय मदतीसाठी 50 पथक तैनात केली आहेत. पुराचा तीव्र फटका बसलेल्या जिल्ह्यांमध्ये युनिसेफतर्फेही सात वैद्यकीय पथक पाठविण्यात आली आहेत. परिमल शुक्लवैद्य आणि अशोक सिंघल हे दोन मंत्री बराक खोऱ्यामध्ये तळ ठोकून आहेत. परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आवश्यक त्या तातडीच्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

अरुणाचल पाऊस

अरुणाचल प्रदेशात पावसाची संततधार सुरूच असून त्यामुळं राज्यातील जनजीवन विस्कळीत झालं आहे. मुसळधार पावसामुळं आतापर्यंत 14 जिल्ह्यांतील 33 गावं आणि सुमारे 3 हजार लोकांना अतिवृष्टीचा फटका बसला असून भूस्खलनात एकूण सात जणांचा मृत्यू झाला आहे. इटानगर आणि अंजाव जिल्ह्यात प्रत्येकी एक जण बेपत्ता आहे. राज्यभरात मोठ्या प्रमाणात पीकं नष्ट झाली असून 392 घरांचे नुकसान झाले आहे. अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खंडू यांनी काल इटानगरमध्ये राज्य आपत्ती प्रतिसाद दल आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यासह सर्व संबंधित विभागांची मान्सून - तयारीबाबत बैठक बोलावली होती. त्यामध्ये त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला.

बिहार पाऊस

बिहारमध्येही पाऊस सुरु असून वीज पडून आणि पावसामुळे काल राज्याच्या विविध भागात 37 जण मृत्युमुखी  पडले तर 13 जण जखमी झाले. मृतांमध्ये बहुतांश शेतमजुरांचा समावेश आहे. ते सर्वजण शेतात काम करत होते. भागलपूर जिल्ह्यातील 9 जण, मुझफ्फरपूरमधील 7 तर वैशाली जिल्ह्यातील 3 जणांचा मृतांमध्ये समावेश आहे.

केरळ, तामिळनाडू पाऊस

केरळ आणि तामिळनाडूमध्येही जोरदार पाऊस सुरू असून तामिळनाडूच्या तेनपेन्नेयार नदीच्या आसपासच्या पाच जिल्ह्यांमध्ये पूर परिस्थिती उद्भवू शकते असा इशारा देण्यात आला आहे; तर केरळमध्येही अनेक भागात पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे.

मान्सून

मान्सून आपल्या नियोजित वेळेपेक्षा पाच दिवस आधीच म्हणजे येत्या 27 तारखेला केरळमध्ये दाखल होईल असा अंदाज हवामान खात्यानं व्यक्त केला आहे. मान्सून साधारणपणे 1 जून रोजी केरळमध्ये दाखल होतो. मात्र असनी वादळाच्या प्रभावामुळे यंदा मान्सून आपल्या नियोजित वेळेपूर्वीच केरळमध्ये दाखल होण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. येत्या दोन दिवसात तो दक्षिण भारताच्या काही भागात, बंगालच्या उपसागराच्या मध्य भागात तसंच अरबी समुद्राच्या काही भागात पोहोचेल असा अंदाज आहे.

या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.